## अपघाताला निमंत्रण देणाऱ्या खड्डयांची दुरुस्ती करा- धर्मराज भलावी

**साकोली :** नागझिरा रोड सध्या खड्डामय झाला असून या मार्गावर अपघाताला निमंत्रण देणारे मोठमोठे खड्डे तयार झाले असून संबंधित विभागाने पावसाळ्यापूर्वी या खड्डयांची दुरुस्ती करून रस्ता विद्यार्थी ,प्रवासी ,वाहन चालक, पर्यटक ,तथा जनतेसाठी व्यवस्थित व सुरळीत करण्याची मागणी भंडारा जिल्हा जंगल कामगारांचा संघाचे अध्यक्ष धर्मराज भलावी व त्यांच्या कार्यकर्त्यांनी केली आहे. जवळून नागझिरा रोडवर असलेल्या डॉ. ब्रह्मानंद करंजेकर यांच्या महाविद्यालयासमोर फार मोठा खड्डा पडलेला आहे. त्या खड्क्यातून लोकांना मोठा त्रास होतो. लोक रात्रीला तिथे पडतात व त्या खड्यामध्ये पाणी साचतो. त्यामुळे रात्री पडण्याची शक्यता असते. करंजेकर महाविद्यालयासमोरून लोकांचे ये-जा सुरू असते. काही नागरिक प्राणायाम करायला येतात, फिरायला येतात. काही विद्यार्थ्यांची कोचिंग क्लासेस असतात. त्यामुळे त्या रस्त्याने नागरिक, विद्यार्थ्यांना ये-जा करावी लागते. एवढा मोठा खड्डा असून प्रशासन व संबंधित विभागाचे अक्षम्य दुर्लक्ष दिसून येते. याच रोडवर कृष्णमुरारी कटकवार महाविद्यालय, डॉ. ब्रह्मानंद करंजेकर कॉलेज, फार्मसी, बीपी एड असे विविध कालेज आहेत. त्याचप्रमाणे तो रस्ता नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्पाकडे जातो. समोरच बौद्धकुटी आहे. बौद्ध कुटीकडे कित्येक लोकांचे ये-जा सुरू असते असे असताना प्रशासनाला जाग कधी येणार? हे न समजण्यापलिकडे आहे. त्या रस्त्याची तात्पुरती दुरुस्ती केली जाते. त्यानंतर पुन्हा रस्त्याची स्थिती 'जैसे थे' होते. या रस्त्याकडे लोकप्रतिनिधी, प्रशासन यांनी लक्ष



घालून त्वरित रस्ता दुरुस्त करण्याची मागणी धर्मराज भलावी अध्यक्ष भंडारा जिल्हा जंगल कामगार संस्थानच्या संघ व विद्यार्थी, पालक व स्थानिक नागरिकांनी केली आहे.

## मोदी सरकारची ११ वर्षांची सेवा, सुशासनातून गरीब कल्याणाला समर्पित- डॉ. परिणय फुके

**महासागर जिल्हाप्रतिनिधी**

**भंडारा , दि. १५जून:** मोदी सरकारचा कार्यकाळ हा देशाच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिला जाईल. विकसित भारत, स्वावलंबी भारत आणि दृढनिश्चयाच्या यशाचे हे दशक ठरले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी १४० कोटी भारतीयांसोबत ११ वर्षांचा यशस्वी प्रवास पूर्ण केला. या काळात भारताच्या उज्ज्वल भविष्याचा भक्कम पाया रचण्यात आला.

या ११ वर्षांमध्ये झालेली कामगिरी सांगणे हे एका भाषणात किंवा चर्चेत मावणारे नाही. मोदी सरकारचा कार्यकाळ म्हणजेच विकसित भारताचे अमृत युग आहे, असे आमदार डॉ. परिणय फुके यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. यावेळी भाजप जिल्हाध्यक्ष आशिष (आशू) गोंडाने, लोकसभा संपर्क प्रमुख बाळा भाऊ अंजनकर प्रदेश कार्यकारिणी सदस्य रेखाताई भाजीपाले, जिल्हा महामंत्री मयूर बिसेन, कुंदाताई वैद्य, विनोद बांते, कल्याणी भुरे , विजय लिचडे, संदीप मेश्राम आदी मान्यवर उपस्थित होते. आमदार डॉ. फुके म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून विकासाला नवे गतीमान दिले. जिथे भाजपची सत्ता आहे, तिथे गरिबांचा खऱ्या अर्थाने विकास झाला आहे. सरकार म्हणजे सेवा व सुशासन ही संकल्पना मोदी सरकारने देशाच्या संस्कृतीचा भाग बनवली आहे. २०१४ पूर्वी देश भ्रष्टाचाराच्या गर्तेत होता. मात्र मोदी सरकारने पारदर्शकता आणि सुधारणा यांचा अवलंब करून देशात विकासाचे नवे युग सुरू केले. योजनेचे फायदे थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात पोहोचवणारी ॲऊ प्रणाली हे याचे स्पष्ट उदाहरण आहे. आज गरीब




कल्याण अन्न योजना, आयुष्मान भारत, उज्ज्वला योजना, आवास योजना, जल जीवन मिशन, किसान सन्मान निधी, जन धन योजना अशा अनेक योजना यशस्वीरित्या राबवल्या जात आहेत. आयुष्मान भारत योजने अंतर्गत ५ लाख रुपयांपर्यंतच्या मोफत उपचाराची सुविधा उपलब्ध झाली आहे. 'मेक इन इंडिया'मुळे देश उत्पादनात स्वयंपूर्ण होत असून, भारत अनेक वस्तू आणि सेवा आज निर्यात करत आहे. ऑपरेशन सिंधूरसारख्या मोहिमांमधून भारताची सुरक्षा आणि सामर्थ्याचे दर्शन जगाला घडले आहे. राम मंदिर, काशी विश्वनाथ कॉरिडॉरसारखी ऐतिहासिक कामे ही केवळ विकास नव्हे, तर देशाच्या संस्कृतीला जपण्याचे प्रतीक आहेत. जीएसटीसारख्या निणऱ्यांनी आर्थिक व्यवस्थेतील भ्रष्टाचाराला आळा बसला आहे. कलम ३७० हटवून देशाची एकात्मता अधिक बळकट झाली आहे. या पत्रकार परिषदेत डॉ. परिणय फुके यांनी भंडारा जिल्ह्यात झालेल्या विकासकामांची माहितीही दिली.

## खासदार श्री प्रफुल पटेल भंडारा व गोंदिया जिल्हयाच्या दौऱ्यावर

**महासागर प्रतिनिधी**

**भंडारा ,दि. १५जून:** आज दिनांक १६ जून सोमवारला खासदार श्री प्रफुल पटेल भंडारा व गोंदिया जिल्हयाच्या दौऱ्यावर असून या दरम्यान विविध ठिकाणी भेटी देणार आहेत.

सकाळी ११.०० वाजता निवास स्थान बगीचा, रामनगर गोंदिया येथे कार्यकर्ता व पदाधिकारी भेट व विविध विषयांवर चर्चा, सायंकाळी ०६.०० वाजता - उद्घाटन राजेश पेट्रोलियम, नवेगाव (गोसे फाटा) तालुका पवनी, ०६.३० वाजता श्री तोमेश्वर पंचभाई यांचे निवासस्थान येनोळा ता.पवनी भेट, सायंकाळी ०७.०० वाजता श्रीमती सुनंदाताई मुंडले यांचे निवासस्थान पवनी येथे भेट



देणार आहेत.

वरील कार्यक्रमांना राष्ट्रवादी काँग्रेसचे वरिष्ठ पदाधिकारी उपस्थित राहणार असून जास्तीत जास्त संख्येने पक्ष पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी उपस्थित राहावे असे आवाहन जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने केले आहे.

## पवनीत सेवा सहकारी संस्था निवडणुकीत परिवर्तन पॅनलचे वर्चस्व - भाजपा व राष्ट्रवादीचे ५ उमेदवार विजयी

**महासागर प्रतिनिधी**

**पवनी ,दि. १५जून:** खरेदी-विक्री सेवा सहकारी संस्थेच्या निवडणुकीत पवनीत परिवर्तन पॅनलने यशस्वी मुसंडी मारत १५ पैकी ५ जागांवर विजय मिळवला.

ही निवडणूक डॉ. परिणय फुके, खासदार प्रफुल पटेल, माजी आमदार राजेंद्र जैन यांच्या नेतृत्वात आणि विलास काटेखाये यांच्या मार्गदर्शनाखाली लढवण्यात आली होती.

या विजयामुळे परिवर्तन पॅनलच्या कार्यकर्त्यांमध्ये आनंदाचे वातावरण असून पुढील काळात संस्थेच्या विकासासाठी ठोस कामगिरी केली जाईल, असा विश्वास नेत्यांनी व्यक्त केला आहे.

***सेवा गटातून विजयी उमेदवार:***
*१. दूधराम सखाराम बावणकर - भाजपा*
*२. दूधराम शामराव बावणकर - राष्ट्रवादी काँग्रेस*
*३. हरी काटेखाये - राष्ट्रवादी काँग्रेस*
***वैयक्तिक गटातून विजयी उमेदवार:***
*४. लीलाधर मोहरकर - भाजपा*
*५. महादेव शिवरकर - एन.टी. गट - राष्ट्रवादी काँग्रेस*

## बायसिकल असोसिएशन भंडाराच्या सदस्याची भंडारा ते पंढरपूर सायकलवारी ला सुरुवात





**महासागर प्रतिनिधी**

**भंडारा ,दि. १५जून:** दिनांक १४ जून २०२५ ला सकाळी ७ वाजता बहिरंगेश्वर मंदिर भंडारा येथून बायसिकल असोसिएशन भंडाराचे काही सायकल स्वार भंडारा ते पंढरपूर अशी सुमारे ७८० किलोमीटरची सायकलवारी ला सुरुवात केली.

ज्यात भंडारा बायसिकल असोसिएशनचे सभासद राजकुमार बावनकर ,सुधाकर कढव ,अरुण आनंद ,प्रवीण कारेमोरे, प्रमोद नेवारे, दादा ठाकरे ,गौरव सेलोकर यांनी सहभाग घेतला तसेच गोंदियाहून आलेले आलेले दोन सायकलपटूही सहभागी झाले.

वारीत जाणाऱ्या सायकलपटूंच्या सत्कारासाठी प्रामुख्याने वारकरी समुदाय उपस्थित होते . अशा ऐतिहासिक सायकलवारीला अविस्मरणीय करण्याकरिता व सायकल स्वारांचा उत्साह व मनोबल वाढविण्याकरिता श्री संजयजी एकापुरे आणि प्राध्यापक सुमंतजी देशपांडे यांनी वारीचा प्रारंभ केला. आषाढी एकादशीनिमित्त दरवर्षी पंढरपूर येथे वारकऱ्यांचे रिंगण घातले जाते. अशाच रिंगणात जवळपास ३००० च्या वर सायकलस्वार आपले रिंगण घालणार आहेत .या सायकल रिंगणमहोत्सवात महाराष्ट्रातल्या ठिकठिकाणाहून सायकल स्वार सायकल रिंगण घालण्यास पंढरपूर येथे जमा होतात अशा रिंगणात प्रथमच भंडारा जिल्हयातील सायकलपटू सहभाग घेणार आहेत हे विशेष.

वारी ही बहिरंगेश्वर मंदिरातून शहराच्या मुख्य रस्त्यांवरून हेडगेवार चौक गांधी चौक पोस्ट ऑफिस चौक मुस्लिम लायब्ररी चौक राजीव गांधी चौक जिल्हा परिषद चौक ते नागपूर नाका पर्यंत गेली. तिथे बायसिकल असोसिएशनचे सभासद व इतर सहकारी मंडळींनी वारकऱ्यांचा निरोप घेतला आणि वारी नागपूरच्या दिशेने सुरू झाली. सायकलवारी ही १५ जून २०२६ रोजी नागपूरहून पंढरपूर कडे रवाना होणार आहे वारीचा मार्ग नागपूर वर्धा यवतमाळ आर्मी उमरखेड नांदेड अहमदपूर लातूर तुळजापूर सोलापूर मोहोळ आणि शेवटी पंढरपूर असा राहणार आहे, वारीला रस्त्यात ठिकठिकाणी राहायची आणि खान पानाची सोय वेगवेगळ्या गावात केलेली आहे .

वारकरी १२० ते १५० किलोमीटर रोज सायकल चालवणार आहेत भंडारा जिल्हयातील सायकलपटू भंडारा ते पंढरपूर सायकलवारी करीत आहेत ही एक ही भंडारा जिल्हयासाठी खूप मोठी गर्वाची बाब आहे असे बायसिकल असोसिएशनचे अध्यक्ष पंकज हरडे यांनी आपले मत व्यक्त केले.

## एसटी अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष



**महासागर प्रतिनिधी**

**सानगडी :** महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळाच्या सानगडी येथील बस थांबा, प्रवासी निवारा येथे असलेल्या प्रवासी निवाऱ्याची छप्पर धोकादायक स्थितीत असून सुमारे तीन वर्षांपूर्वी या निवाऱ्याचे सिमेंट छप्पर उडून गेले टीनाचे पत्रे उडून गेल्यामुळे ऊन व पावसात प्रवाशांना त्रास सहन करून जीव मुठीत घेऊन बसची वाट पाहावी लागते याकडे डेपो मॅनेजर साकोली यांचे गावकऱ्यांनी अनेकदा लक्ष वेधले परंतु छप्पराची दुरुस्ती झाली नाही साकोली, लाखांदूर, नवेगावबांध, मोरगाव, अर्जुनी या तिहेरी मार्गावर सानगडी हे गाव बसले असून परिसरातील लहान-मोठे १५ ते २० गावातील लोक प्रवासासाठी एसटी बस पकडण्यासाठी सानगडी बस स्थानकावर येतात व बसची वाट पाहतात या प्रवासी निवाऱ्यात आश्रय घेतात परंतु या प्रवासी निवाऱ्याचे वर असलेले सिमेंटचे पत्र्याचे छप्पर काही ठिकाणी उडून गेल्याने चांगलेच भगदाड पडले त्या भगदाळ्यातून ऊन व पाऊस आत बसलेल्या प्रवाशांवर येत असल्याने प्रवाशांना आपले अंग चोरून बसावे लागते वादळवारा सुटल्यास आत मधील प्रवासी आपला जीव मुठीत धरून त्यातून शेजारच्या हॉटेलमध्ये व नागरिकांच्या घरी आसरा घेतात बस थांबा असल्यामुळे या परिसरात हॉटेलची व इतर व्यवसायीकांची चांगलीच रेलचेल होऊन हे गर्दीचे ठिकाण झाले आहे . वादळ, वारे, तुफान सुटल्यास हा प्रवासी निवारा धोकादायक ठरू शकतो गेल्या तीन वर्षांपूर्वी या निवाऱ्यावरून सिमेंटचें काही पत्रे उडून गेले होते नागरिकांनी एसटी आणि महामंडळाच्या अधिकाऱ्याचे अनेकदा लक्ष वेधले परंतु हा प्रवासी निवारा दुरुस्त करण्याची तसदी घेतली नाही या प्रवासी निवाऱ्याचे नूतनीकरणाचे काम त्वरित करावे अशी प्रवाशांची मागणी आहे . सानगडी हे एसटी महामंडळाचे चांगले उत्पन्न देणारे बस स्थानक आहे हे येथे उलेखनीय आहे .

## नरेंद्र पहाडे यांना सामाजिक शास्त्र क्षेत्रातील कार्याबद्दल मानद डॉक्टरेट प्रदान



**महासागर प्रतिनिधी**

**भंडारा ,दि. १५जून:** भंडारा जिल्ह्याचे उद्योजक, समाजसेवक आणि उदयोन्मुख राजकारणी श्री नरेंद्र पहाडे यांना सामाजिक शास्त्र क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल मानद डॉक्टरेट पदवीने सन्मानित करण्यात आले आहे.

दिल्ली येथे आयोजित भव्य समारंभात देशभरातील विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत त्यांना ही पदवी प्रदान करण्यात आली. श्री नरेंद्र पहाडे यांना भंडारा जिल्ह्याने दिलेले प्रेम आणि पाठिंबा यामुळे ते सदैव समाजकार्याच्या सेवेत कार्यरत राहिले आहेत आणि आजही त्या कार्यात अग्रेसर आहेत.

मागील निवडणुकीत त्यांनी स्वतंत्र उमेदवार म्हणून भाग घेतला होता. त्यावेळी मतदारांमध्ये त्यांच्याबाबत विशेष आवड निर्माण झाली होती. अनेकांच्या अपेक्षा असूनही बहुमत मिळू शकले नाही. तरीही श्री पहाडे यांनी पराभवाकडे दुर्लक्ष करत समाजासाठी आपले कार्य अविरत सुरू ठेवले आहे.

ते आधीपासूनच B.Com, MBA आणि LLB या पदव्या प्राप्त केलेले असून, ही मानद डॉक्टरेट पदवी त्यांच्या शैक्षणिक व सामाजिक प्रवासात आणखी एक मानाचा तुरा ठरली आहे.

**पदवी स्वीकारताना त्यांनी भावनिक प्रतिक्रिया दिली**

'ही पदवी माझ्या वैयक्तिक कार्यांची नाही, तर भंडारा जिल्ह्यातील जनतेच्या प्रेमाची आणि पाठिंब्याची साक्ष आहे. समाजासाठी कार्य करणे हेच माझे ध्येय राहिले आहे आणि राहील.' या सन्मानामुळे भंडारा जिल्ह्यात आनंदाचे वातावरण आहे. विविध सामाजिक संस्था, नागरिक व हितचिंतकांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## आदिवासी जीवन अनुभवण्यासाठी राज्य सरकारकडून भंडारा जिल्हयातील पिटेझरी गावाची निवड

### जिल्हयातील एकमेव गावाचा समावेश

**शाहेद कुरैशी**

**साकोली ,दि. १५जून:** राज्यात आदिवासी समाज मोठ्या प्रमाणावर पसरलेला आहे. त्यांचे जीवन अनुभवणे आणि संस्कृती समजून घेणे हा प्रत्येकासाठी वेगवेगळा अनुभव असू शकतो. त्यामुळे पाड्यांवरील आदिवासी जीवन अनुभवण्यासाठी भंडारा जिल्हयातील साकोली तालुका अंतर्गत येणाऱ्या पिटेझरी या एकमेव गावाची निवड राज्य शासनाकडून करण्यात आली आहे.

शबरी आदिवासी पर्यटन योजनेतून राज्यातील एकूण १२ जिल्हयांतर्गत अनेक गावांची निवड करण्यात आली. ज्यात साकोली तालुक्यातील पीटेझरी गावाचा समावेश आहे. विशेष म्हणजे यापूर्वी आदिवासी विकास विभागाकडून या संदर्भात सर्वे करण्यात आलेला होता. त्यातून पिटेझरी गावाची निवड करण्यात आली. आदिवासी विकास विभागाकडून पर्यटनास अनुकूल अशा सोयीसुद्धा या निमित्ताने या ठिकाणी विकसित करण्यात येणार आहे. साकोली वरून अवघ्या काही कि. मि. अंतरावर असलेले पिटेझरी हे गाव. एकाच गावात संपूर्ण आदिवासी नागरिकांची वस्ती असलेले हे तालुक्यातील पहिले गाव. या गावात पर्यटकांना नागझिरा अभयारण्य व्याघ्र प्रकल्पाकडे अवागमन करण्यासाठी प्रवेशद्वार आहे.

या गा-वातूनच नागझिरा अभयारण्य व्याघ्र प्रकल्पाची सीमा प्रारंभ होते. ज्यामुळे या गावाला अगदी आगळे वेगळे महत्व प्राप्त झालेले आहे. त्यात निसर्गवेडे, निसर्गतज्ञ, पर्यावरण आणि पक्षीप्रेमी किरण पुरंदरे हे आपल्या सहचारिणीसह या गा-वात काही काळासाठी निसर्ग अभ्यासाच्या निमित्ताने स्थिरावल्याने या गावाला आणखीनच मोठेपण प्राप्त झाले. किरण पुरंदरे आणि पिटेझरी असे एक नव्याने साकोली तालुक्यात



समीकरण तयार झाले आहे.

दुसरीकडे शबरी आदिवासी पर्यटन योजनेतून या गावातील आदिवासी जीवन शैली आणि संस्कृती टिकवून ठेवण्यासाठी हातभार लागणार आहे. यातून पर्यटकांसाठी होम स्टील स्मरण वस्तूंची दुकाने यांची उभारणी सुद्धा या गा वात करण्यात येणार आहे. जंगलाचे राखणदार मानल्या जाणाऱ्या आदिवासींची जीवनशैली, संस्कृती, खाद्यपदार्थ, नृत्य याविषयी शहरी वासीयांना नेहमीच आकर्षण आणि कुतूहल राहिलेले आहे.

राज्यात अनेक ठिकाणी खासगी पातळीवर ग्रामीण पर्यटन सुरू झालेली आहेत. असे असले तरी आदिवासी जीवन अजूनही पर्यटक आणि पर्यटनांपासून दूर आहे. हाच विचार करून आदिवासी बहुल भागातील पर्यटनक्षम गावे विकसित करण्यासाठी शबरी आदी पर्यटन योजना राबविण्यास राज्य सरकारने नुकतीच मंजुरी दिलेली आहे. या योजनेच्या अंमलबजावणीसाठी प्रथम ग्राम पर्यटन समितीची स्थापना केली जाणार आहे.

त्यानंतर त्यांच्या माध्यमातून प्रत्येक गावात १० कुटुंबाची निवड केली जाणार आहे. यात प्रत्येकी पाच लाख रुपये खर्चाद्वारे होमस्टेची उभारणी करण्यात येईल. गावातील पायाभूत सुविधांसाठीही वेगळा खर्च केला जाणार आहे. गावात स्मरण वस्तू दुकानाची उभारणी करण्यात येणार आहे. प्रत्येक गावात समन्वयकाची नेमणूक करून ही योजना व्यवस्- थत राबविण्याची खबरदारी घेण्यात येणार आहे.

***विदर्भातून १० गावांची निवड***

पाड्यावरील आदिवासी जीवन अनु-भवण्यासाठी विदर्भातून एकूण १० गावांची निवड महाराष्ट्र राज्य शासनाच्या आदिवासी विकास विभागाकडून करण्यात आली. विदर्भातील या १० गावांमध्ये जिल्हा गडचिरोली तालुका भामरागड गाव-देवराई, कलाग्राम, जिल्हा चंद्रपूर तालुका चिमूर गाव-आडेगाव, तालुका बरोरा गाव-निमढेला. जिल्हा अमरावती तालुका चिखलदरा गाव - आमझरी, खाटकली, जि-ल्हा भंडारा तालुका साकोली गाव - पिटेझरी, जिल्हा गोंदिया तालुका तिरोडा गाव - चोरखमारा. जिल्हा यवतमाळ तालुका पांढरकवडा गाव अंधारवाडी, जिल्हा नागपूर तालुका सावनेर गाव - भोंडेताल या गावांचा समावेश आहे.

## जिल्हास्तरीय जलतरण स्पर्धेत कार्तिक वाडीभस्मे प्रथम



**महासागर प्रतिनिधी**

**भंडारा ,दि. १५जून:** जीबी कूब भंडारा येथे जिल्हास्तरीय जलतरण स्पर्धा आज दिनांक १५ जूनला संपन्न झाली.

या जिल्हास्तरीय जलतरण स्पर्धेत मुलांच्या फ्री स्टाईल १३ ते १५ या वयोगटात कार्तिक बिरजू वाडीभस्मे याने प्रथम क्रमांक पटकवीला.यापूर्वी त्याने अनेक जलतरण स्पर्धा जिंकल्या आहेत. वैनगंगा नदीत कारधा ते कोरंभी हे ५ किमी. अंतर देखील त्याने पार केले आहे. प्रशिक्षक प्रशांत कारेमोरे आणि प्रशिक्षक मयूर राखडे यांनी त्याचे अभिनंदन केले आहे. याबद्दल त्याचे सर्वत्र अभिनंदन कौतुक केले जात आहे.

# उपजिल्हा रुग्णालयाला छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव द्या

## शिवसेना ( शिंदे ) गटाचे आरोग्यमंत्र्यांना निवेदन

**महासागर प्रतिनिधी**
**साकोली ,दि.१५जून:** स्थानिक शहरातील उपजिल्हा रुग्णालयास छत्रपती शिवाजी महाराज उपजिल्हा रुग्णालय असे नाव द्यावे अशा मागणीचे निवेदन शिवसेना ( शिंदे ) गटाचे साकोली शहर प्रमुख सचिन घोनमोडे यांच्या मार्फत महाराष्ट्र राज्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आंबिटकर यांना देण्यात आले. सदर निवेदनात, सण १९४७ पासून साकोली येथे प्राथमिक आरोग्य रुग्णालय, कुटीर रुग्णालय, ग्रामीण रुग्णालय आणि त्यानंतर उपजिल्हा रुग्णालयात रूपांतरित झाले. सदर रुग्णालयाच्या नावात वेळोवेळी बदल होत गेले. त्यामुळे सदर रुग्णालयाला आता छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव देण्याची मागणी शिवसेना ( शिंदे ) गट शहर प्रमुख साकोली यांनी केलेली आहे.



# नकली बियाणे व अवैध खतांच्या विक्रीला आळा घाला

## खा. डॉ. प्रशांत पडोळे यांची जिल्हा प्रशासनास स्पष्ट सूचना

**महासागर प्रतिनिधी**
**भंडारा ,दि.१५जून:** खरीप हंगाम २०२५ अवघ्या काही आठवड्यांवर येऊन ठेपलेला असताना, शेतकरी बांधवांनी बियाणे व खत खरेदीला सुरुवात केली आहे. मात्र, मागील काही वर्षांतील अनुभव लक्षात घेता, नकली बियाणे आणि अवैध खतांमुळे अनेक शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. काही कंपन्यांनी दर्जाहीन बियाणे वितरित केले आणि काही अनधिकृत विक्रेत्यांनी बनावट खते विक्री करून शेतकऱ्यांचा विश्वासघात केला.

या पार्श्वभूमीवर भंडारा-गोंदिया लोकसभा मतदारसंघाचे खा.डॉ. प्रशांत पडोळे यांनी जिल्हा प्रशासनाला सखोल उपाययोजना राबवण्याचे स्पष्ट निर्देश दिले आहेत. शेतकऱ्यांचा विश्वास राखण्यासाठी आणि हंगाम सुरळीत पार पाडण्यासाठी भंडारा जिल्हाधिकारी यांनी स्वतः पुढाकार घ्यावा अशी सूचना त्यांनी केली आहे.

खा.डॉ. पडोळे यांनी प्रशासनाला सुचवले आहे की, बियाणे व खत विक्री करणाऱ्या अधिकृत विक्रेत्यांची यादी ग्रामपंचायत व कृषी सहाय्यकांच्या माध्यमातून गावपातळीवर जाहीर करण्यात यावी. परवानाधारक कंपन्यांनाच बियाण्यांची विक्री करण्याची परवानगी द्यावी. नकली बियाणेविरोधात जनजागृती मोहीम राबवावी आणि खत-बियाण्याचे नियमित नमुना तपासणी करून दोषी कंपन्यांवर कारवाई करावी. मागील पाच वर्षांतील तपासणीत किती दोषी नमुने सापडले याचा अहवालही तयार करावा, असे निर्देश त्यांनी दिले.

खा. पडोळे यांनी असेही सुचवले की, अधिकृत पावतीवर बियाणे खरेदी करूनही उत्पादन न झाल्यास शेतकऱ्यांना नुकसानभरपाई मिळावी, यासाठी जिल्हास्तरीय



विशेष समिती स्थापन करावी. खाजगी कंपन्यांनी विक्रीपूर्वी संबंधित बियाण्याचे गुणवत्ता प्रमाणपत्र सादर करणे सक्तीचे करावे.

वरील उपाययोजनांमुळे शेतकऱ्यांचे नुकसान टाळता येईल, त्यांचा प्रशासनावरचा विश्वास वाढेल आणि जिल्ह्याची उत्पादनक्षमता व गुणवत्ता दोन्ही सुधारेल, असे प्रतिपादन खासदार पडोळे यांनी केले.

***मला संपर्क करा - खासदार डॉ. पडोळे***

शेतकऱ्यांना जर कोणत्याही प्रकारचा त्रास झाला, नकली बियाणे वा खत खरेदी केल्यामुळे नुकसान झाले असेल, तर त्यांनी थेट माझ्या कार्यालयाशी संपर्क साधावा. अशा शेतकऱ्यांच्या पाठीशी मी उभा आहे आणि त्यांच्या हक्कांसाठी शासन पातळीवर लढा देईन, असे ठाम आश्वासन खासदार डॉ. प्रशांत पडोळे यांनी दिले आहे.

# बेलोरे पिकपची मोटरसायकलला धडक

***मोटार सायकल चालक.गंभीर जखमी जखमी. *खापा चौफुली येथील घटना**

**महासागर प्रतिनिधी**
**भंडारा ,दि.१५जून:** भंडारा कडून भरधाव वेगाने येणारा बेलोरा पिकअपने खापा चौफुली येथे मोटरसायकलला धडक दिल्याने मोटरसायकल चालकाच डावा पाय मोडल्याची घटना खापा चौक येथे सायंकाळी ५.३०. वाजता घटली.

जखमीचे नाव प्रज्वल साठवणे वय २२ वर्ष रा. तुमसर व रोशन भुरे गंभीर जखमी झाले असून प्रज्वल साठवणे याच्या डावा पाय मोडला असून त्याला गावकरी व वाहतूक पोलीस अमोल मदतीने शासकीय रुग्णालय तुमसर येथे नेण्यात आले. महिंद्रा बोलेरो पिकप घटना स्थळावरून पसार झाली असून तुमसर पोलीस. तपास करीत आहे.

***अपघाताच्या हॉट स्पॉट***

भंडारा बालाघाट महामार्ग व रामटेक ते गोंदिया महामार्ग हा खापा इथून जातो. चौक इथे भरगा वेगाने वाहने धावत असल्यामुळे दररोज इथे छोटे-मोठे अपघात होत असतात त्यामुळे खापा चौक हे अपघाताकरिता हॉटस्पॉट ठरला आहे. खापा चौक येथे अपघाताला आळा घालण्याकरिता सिग्नल लाईट बसविण्यात यावी अशी मागणी राहुल बडवाईक राष्ट्रवादी (शरद चंद्र पवार) युवा तालुका अध्यक्ष यांनी केली आहे

# किन्ही येथे मनरेगा अंतर्गत आठव्या टप्प्याचे पाट दुरुस्ती चे काम सुरू

****किन्हीकरांना मिळतोय ४५ दिवसांपासून मनरेगा चे काम *सरपंचांचा पुढाकार किन्ही येथे मिळतो हंगामी रोजगार*मनरेगा अंतर्गत ५०० मजुरांना काम ; कामाचे ७ टप्पे पुर्ण, आठव्या टप्प्याला सुरूवात***



**महासागर प्रतिनिधी**
**किन्ही मोखे ,दि.१५जून:**
साकोली पंचायत समिती अंतर्गत येत असलेल्या ग्राम किन्ही ( मोखे) येथे ४५ दिवसांपासून शासनाच्या महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतून शेतशिवारातील पांदन रस्त्याचे कामे व तलवाचे पाणी जाणाऱ्या पाट दुरुस्ती चे कामे सुरू आहेत. रोहयो च्या अकुशल मजुर प्रधान कामावर प्रतिदिन जवळपास किन्हीच्या पाचशे रोहयो मजुरांना हाताला काम मिळाले आहे येथील पांदन रस्त्याचे सात टप्प्यांचे काम पूर्ण झाले आहे. व लगेच आठव्या टप्प्यात तलावाचे पाणी जाणाऱ्या पाट दुरुस्ती च्या कामाला सुरुवात करण्यात आली आहे. दरवर्षी प्रमाणे यावर्षीही स्थानिक सर्व मजुरांना कामाची उपलब्धता होऊन प्रत्येकाच्या हाताला काम व कामाप्रमाणे दाम मिळावा म्हणून येथील लोकसेवक, राज्य सरकारकडून पुरस्कृत शेतीनिष्ठ शेतकरी, माजी पं.स. सदस्य, कर्तव्यदक्ष गाव कारभारी सरपंच घनश्यामभाऊ पारधी यांच्या सखोल नियोजनाने व पुढाकाराने येथील मजुरांना सलग दिड महिन्यापासून रोहयो चे काम मिळत आहे. गतवर्षीही सरपंच घनश्यामभाऊ पारधी यांनी केलेल्या नियोजनामुळे ४८ दिवस रोहयो मजुरांना हंगामी रोजगार मिळाले होते.

यावर्षी सुध्दा ७ मस्टर शेत पांदन रस्त्याचे काम पूर्ण झाले असून ८ वा मस्टर पाट दुरुस्ती चे काम सुरू आहे. सदर कामे साकोली पंचायत समितीचे गटविकास अधिकारी जाधव, विस्तार अधिकारी कांबळे, तांत्रिक पॅनल अधिकारी सुनील कापगते यांच्या मार्गदर्शना खाली सुरू असून पंचायत समिती रोहयो विभागाचे एपीओ अतुल जिमेकर, शुभम नंदागवळी, आंबेडारे, रोहयो विभागाच्या संगणक परिचालक संध्या भैसारे, अर्चना पाटील, चांदुरकर मॅडम, महेंद्र तुरकर, कठाणे यांचे सहकार्य लाभत आहे.

किन्ही(मोखे) येथील ५०० मजुरांच्या हाताला मनरेगांतर्गत हंगामी काम मिळाले असून स्थानिक ग्राम रोजगार सहाय्यक भाऊराव राऊत मनरेगा चे काम सांभाळत आहेत. रोजगार सहाय्यक भाऊराव राऊत यांना मनरेगा चे अकुशल कामांत प्रथम मजुर (मजुर प्रतिनिधी) म्हणून खेमराज नंदेश्वर , संजय पटले , विश्वदीप साखरे ,होमराज वलथरे , नकटू कागदे , गौतम रामटेके, शुभम राऊत मदत करत आहेत.

येथील सात टप्प्यांतील अंदाजपत्रकीय ३५ लक्ष रुपये किंमतीची मजुर प्रधान अकुशल कामे पूर्ण झाली असून पाच लक्ष रुपये किंमतीचे आठव्या टप्प्याचे पाट दुरुस्ती चे काम टिपीओ सुनील कापगते (तांत्रिक पॅनल अधिकारी) यांच्या कार्यकुशल तांत्रिक नियोजनात काम पूर्ण होत आहे. येथील रोहयो मजुरांचे हजेरी ऑनलाईन पद्धतीने होत असून कामाच्या मोजमापानूसार मजुरी दराप्रमाणे मजुरांची मजुरी देयके ऑनलाईन पद्धतीने मजुरांच्या बॅंक खात्यात जमा करण्यात येणार आहेत. मनरेगा अंतर्गत कामाची उपलब्धता होत असल्याने येथील रोहयो मजुरांनी समाधान व्यक्त केले आहे.

# जो स्वाभिमानी नाही तो शिव सैनिक नाही : आ .नरेंद्र भोंडेकर

## पूर्व विदर्भ शिवसेनेचे नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचा नियुक्ती पत्र वितरण सोहळा



**महासागर प्रतिनिधी**
**भंडारा ,दि.१५जून:** जो शिव सैनिक स्वाभिमानी नाही तर तो सच्चा शिव सैनिक नाही, कारण स्वाभिमानी राहाल तरच संगठन मजबूत कारण्या करिता बाध्य राहाल आणि असाच शिव सैनिक हा पद करिता नाही तर पक्षाला मोठा कारण्या कारीतच काम करतो, असे वक्तव्य शिवसेनेचे उपनेते आम. नरेंद्र भोंडेकर यांनी व्यकात केले.

आज येथील मंगलमूर्ती सभागृहात पूर्व विदर्भ शिवसेनेच्या नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे नियुक्ती पत्र वितरण सोहळा आयोजित करण्यात आला होता. या प्रसंगी ते कार्यक्रमाध्यक्ष म्हणून बोलत होते. या कार्यक्रमात प्रमुख अतिथि म्हणून गोंदिया भंडारा लोकसभा संपर्क प्रमुख संजय कुंभलकर, भंडारा जिल्हा प्रमुख अनिल गायधने नव नियुक्त जिल्हा प्रमुख पदमाकर बावनकर, माजी आ . मनोहर चंद्रिकापुरे, माजी आ . सहसराम कोरेटी, सह समन्वयक बंडू तागडे, सह समन्वयक आशीष देसाई, चंद्रपूर चे जिल्हा संपर्क प्रमुख मंगेश काशीकर, वर्धा चे संपर्क प्रमुख राजू दीक्षित, भंडारा गोंदिया लोकसभा संघटक डॉ सुगत चंद्रिकापुरे, गोंदिया जिल्हा प्रमुख सोनू कुथे, जिल्हा प्रमुख सुरेन्द्र नायडू व अन्य पदाधिकारी मंचावर उपस्थित होते.

कार्यक्रमची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज, हिंदू हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे आणि आनंद दिघे यांना माल्यार्पण करून करण्यात आली.

आपल्या अध्यक्षीय भाषणात आम. भोंडेकर पुढे म्हणाले की पूर्व विदर्भातील सहाही जिल्हया करिता झालेल्या नियुक्त्या बघून त्यांचे आत्मविश्वास दुप्पट झाले आहे की ये-त्या निवडणुका काढतांना त्यांच्या पाठीशी मर्द मावळे उभे राहणार आहेत आणि त्यांना मर्द मावळ्यांसह काम करायला आवडते. ते म्हणाले की आजचा सोहळा हा त्यांच्या करीत नवीन अनुभव घेणारा आहे. कारण पूर्व विदर्भात शिंदे साहेबांची शिवसेना ही चौथ्या क्रमांकावर आहे. परंतु आज झालेल्या नितूकट्या पाहून असे वाटत आहे की २०२९ च्या निवडणुकीत आपला पक्ष क्रमांक एक वर राहील. म्हणून आता आपसी मतभेद करण्या पेक्षा विरोधकांना कसे पछाडता येईल या कडे लक्ष केंद्रित करा. आम. भोंडेकर यांनी हमी दिली की पूर्व विदर्भातील गावो गावी शिव सेनेची शाखा उभारा. त्या प्रत्येक शाखेला भेट देऊन पक्ष मजबुतित मी तुमच्या पाठीशी उभा राहील. अश्या वेळी शत्रूशी लढतांना टीम मजबूत असणे आवश्यक आहे अन्यथा आपलाच बळी जातो. म्हणून आपली टीम मजबूत बनवा, ज्या मुळे येणाऱ्या प्रत्येक निवडणुका लढणे सोपे होईल. कार्यक्रमाचे संचालन शिवसेना शहर प्रमुख मनोज साकुरे यांनी केले तर आभार प्रदर्शन सह समन्वयक आशीष देसाई यांनी केले. पूर्व विदर्भाच्या सहाही जिल्ह्यातून आलेल्या पदाधिकाऱ्यांनी आ . नरेंद्र भोंडेकर यांचे भव्यरित्या स्वागत केले.

# रा.प.मं.ची ई बस साकोली पर्यत आणावी - भाजपा

***साकोली आहे मुख्य तहसिल व मध्यवर्ती आगार***

**महासागर प्रतिनिधी**
**साकोली ,दि.१५जून:** नागपूर ते लाखनी सुरू झालेली महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाची वातानुकूलित इलेक्ट्रॉनिक बस ही मुख्य मध्यवर्ती साकोली आगार पर्यंत चालवावी. अशी मागणी करण्यात आली.



यासाठी वि. प. आ. डॉ. परीणय फुके यांचेशी साकोली भाजपाचे पदाधिकारी चर्चा करणार असल्याचे सांगितले. कारण साकोली हे मुख्य जूने तहसील आणि मध्यवर्ती आगार सुद्धा आहे. व ही बस साकोली पर्यंत आणन्यासाठी सर्वोपरी प्रयत्न केले जातील असे सांगितले. कारण साकोली ही ब्रिटिशांच्या काळातील मुख्य तहसिल शहर आहे. आणि येथून एकोडी, सानगडी, लाखांदूर, सौंदड रेल्वे येथून दररोज असंख्य पारिवारिक आणि व्यापारीक प्रवासी उपराजधानी नागपूरहून ये जा करतात हे विशेष. नागपूर ते साकोली हे अंतर १०० किमी. आहे. नुकतेच राज्य परिवहनची वातानुकूलित इलेक्ट्रॉनिक बस ही नागपूर ते लाखनी पर्यंत येत आहे. कारण बसला पर्याप्त चार्जिंग व्यवस्था ही होणे आवश्यक आहे. परंतू साकोली या मुख्य आणि मध्यवर्ती आगारात 'हायस्पीड चार्जिंग स्टेशन' ची व्यवस्था होऊ शकते. कारण लाखनी ते साकोली हे अंतर १७ किमी. असून नागपूर ते साकोली पर्यंत ही महामंडळाची वातानुकूलित इलेक्ट्रॉनिक बस चालवावी अशी मागणी साकोली शहर भाजपा अध्यक्ष व्यंकटेश येवले, डाकराम कापगते, नितीन खेडीकर, किशोर पोगळे, महादेव कापगते व प्रा. अमोल हलमारे यांनी केली असून याबाबद लवकरच आमदार डॉ. परीणय फुके यांचेशी चर्चा करणार असल्याचे सांगितले आहे.

# योग व संस्कार शिबिरातून तयार होतील देशाचे सुजाण नागरिक - टी. नरसिंह मूर्ती

**गोपीवाडा येथे ५ दिवसीय भव्य योग व बालसंस्कार शिबिर समारोप**

**महासागर प्रतिनिधी**
**भंडारा ,दि.१५जून :** भंडारा शहरापासून जवळ असलेल्या गोपीवाडा (शाहपूर) या गावात कमांडो ग्रुपचे संस्थापक, माजी सैनिक आणि सामाजिक कार्यकर्ते श्री. चंद्रशेखर डोळस यांच्या वतीने ५ दिवसीय योग व बालसंस्कार शिबिराचे भव्य आयोजन करण्यात आले. या शिबिराची सुरुवात ८ जून रोजी झाली आणि समारोप १२ जून रोजी झाला. गोपीवाडा, शाहपूर तसेच इतर गावांमधून आलेल्या सुमारे ३०० मुलांनी या शिबिरात भाग घेतला. या शिबिरामध्ये योग, प्राणायाम, विविध आसने, मुद्रांचे मार्गदर्शन तसेच धावण्याची शर्यत, बॉक्सिंग, कराटे यांसारख्या अनेक शारीरिक क्रियाकलापांचे प्रशिक्षण देण्यात आले. या उपक्रमामुळे गावात एक अध्यात्मिक वातावरण निर्माण झाले होते आणि मुलांमध्ये मोठ्या प्रमाणात उत्साह दिसून आला.

भारतीय सेनेचे कमांडो तसेच शिबिराचे मुख्य प्रशिक्षक श्री. चंद्रशेखर डोळस यांच्या मार्गदर्शनाखाली शिबिर अत्यंत उत्साही वातावरणात पार पडले. शिबिराच्या समारोप प्रसंगी MMPL कंपनीचे जनरल मॅनेजर श्री. टी. नरसिंह मूर्ती, मॅनेजर श्री. राकेश वाघाये, सरपंच श्री. विनायक टांगले, भंडाऱ्याचे प्रमुख योग शिक्षक श्री. शाम कुकडे, ग्रीन हेरिटेज फाउंडेशनचे सईद शेख, अतुल वर्मा तसेच प्रहरी बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष योगेश गहाणे, सचिव शिल्पा डोळस, रितू टांगले, शालिनीताई झलके, रेखाताई खटके आणि गावातील अनेक मान्यवर, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रथम मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. श्री. नरसिंह मूर्ती यांनी आपल्या भाषणात 'योग व



बालसंस्कार शिबिरांमुळेच देशाचे सुजाण नागरिक घडतात,' असे प्रतिपादन केले. श्री. राकेश वाघाये, सईद शेख, विनायक टांगले, अतुल वर्मा, शाम कुकडे यांच्याही मार्गदर्शनाने शिबिरार्थींना प्रेरणा मिळाली.श्री. चंद्रशेखर डोळस यांनी सलग ५ दिवस मुलांना योग, प्राणायाम, संस्कार, श्रम, सामाजिक जबाबदारी, साहसी खेळ आणि इतर आवश्यक प्रशिक्षण दिले. शिबिरात सहभागी सर्व मुलांना श्श्ड्थ कंपनीतर्फे टिफिन बॉक्स, प्रमाणपत्रे, नाश्ता इत्यादी वितरित करण्यात आले. मुलांचा उत्साह बघण्याजोगा होता.

या शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी श्श्ड्थ कंपनी मारेगावचे जनरल मॅनेजर श्री. टी. नरसिंह मूर्ती, मॅनेजर राकेश वाघाये, ग्रामपंचायत, सरपंच विनायक टांगले, ग्रामस्थ यांचे अमूल्य सहकार्य लाभले. शिबिराचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन श्री. चंद्रशेखर डोळस यांनी केले.

# बदाम - एक सुपरफूड : आयडीए नागपूरने उलगडले आरोग्याचे रहस्य

**महासागर प्रतिनिधी**
**भंडारा ,दि.१५जून:** इंडियन डायटेटिक असोसिएशन (आयडीए) च्या नागपूर विभागाने अल्मंड बोर्ड ऑफ कॅलिफोर्निया यांच्या सहकार्याने शहरातील हॉटेल सेंटर पॉइंट येथे आहारतज्ञ आणि न्यूट्रिशन प्रोफेशनल्ससाठी एक शैक्षणिक सत्र आयोजित केले.

या सत्राचा उद्देश बदामांमध्ये असलेल्या पोषणमूल्यांबद्दल जागरूकता निर्माण करणे आणि दैनंदिन आहारात बदामांचा समावेश केल्यास मिळणारे आरोग्यदायी फायदे सर्वांपर्यंत पोहोचवणे हा होता.

हे सत्र न्यूट्रिशन आणि वेलनेस कन्सल्टंट श्रीमती शीला कृष्णस्वामी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले. त्यांनी हृदयविकार आणि मेटाबोलिक आरोग्य, स्नायूंना होणारे फायदे आणि रक्तातील साखरेचे नियमन या विषयांवर झालेल्या तीन महत्त्वपूर्ण संशोधनांचा आढावा घेतला.




यानंतर झालेल्या पॅनल चर्चेमध्ये श्रीमती शीला कृष्णस्वामी यांच्यासोबत डॉ. कविता गुप्ता (सचिव, आयडीए नागपूर विभाग) आणि डॉ. रेनुका माईंदे (कोषाध्यक्ष, आयडीए नागपूर विभाग) सहभागी झाल्या होत्या. डॉ. कविता बक्षी (संयोजिका, आयडीए नागपूर विभाग) यांनी चर्चा सत्राचे सूत्रसंचालन केले.

या चर्चेसाठी आवश्यक संशोधन अल्मंड बोर्ड ऑफ कॅलिफोर्नियाने प्रायोजित केले होते. या संशोधनामध्ये पाउला आर ट्रुम्बो, जेमी अर्ड, फ्रान्स बेलिस्ले, अँडम ड्रेवनोव्स्की, जॅक ए गिल्बर्ट, रोनाल्ड क्रेनमन, अनुप मिश्रा, जॉन सिव्हनपिपर, माहा ताहीरी, कॅरोल ई वॉटसन, जेम्स हिल, मार्क कर्न, विश्वनाथन मोहन आणि सुधा वासुदेवन या नामवंत आहारतज्ज्ञ आणि आरोग्य क्षेत्रातील तज्ज्ञांनी योगदान दिले. त्यांच्या अभ्यासातून हे निष्पन्न झाले की दररोजच्या आहारात बदामांचा समावेश केल्याने आरोग्यावर सकारात्मक परिणाम होतो.

या कार्यक्रमात श्रीमती शीला कृष्णस्वामी यांनी करंट डेव्हलपमेंट्स इन न्यूट्रिशन मध्ये प्रकाशित झालेल्या तज्ज्ञांच्या अभ्यासांवर आधारित माहिती दिली.

त्यानुसार दररोज बदाम खाल्ल्याने एलडीएल (बॅड कोलेस्ट्रॉल) कमी होण्यास मदत होते आणि डायास्टोलिक ब्लड प्रेशर थोडकं कमी होते - जे दोन्हीही हृदयाच्या आरोग्यासाठी आवश्यक आहे आणि त्याचा वजनावर कुठलाही वाईट परिणाम होत नाही. विशेषतः प्रीडायबेटिस असलेल्या भारतीयांमध्ये बदाम सेवनामुळे रक्तातील साखरेचे नियंत्रण चांगले राहते.

कृष्णस्वामी म्हणाल्या, दररोज मूठभर बदाम खाल्ल्याने हृदयाचे आरोग्य सुधारते. बॅड कोलेस्ट्रॉल कमी होतो, थोडक्यात रक्तदाबही कमी होतो आणि वजन वाढत नाही. काही लोकांचे वजन थोडं कमीही होऊ शकतं आणि त्यांचे ब्लड शुगर लेव्हल चांगले नियंत्रित राहू शकतात. हा आरोग्याची काळजी घेण्याचा एक सोपा आणि चविष्ट मार्ग आहे.

# इन्शुरन्स च्या नावाखाली शेतकऱ्यांची लूट







**महासागर प्रतिनिधी**
**लाखनी ,दि.१५जून :** क्षेमा सुकृती ही हैदराबादची कंपनी असून महाराष्ट्रात काम काम करत आहे. त्यात भंडारा जिल्ह्यातील लाखनी तालुक्यात काही शेतकऱ्यांनी उन्हाळी धान पिकाचे इन्शुरन्स दिनांक १जानेवारी ते १जून २०२५ ह्या कालावधीमध्ये कंपनीने दिलेल्या आठ क्लेम पैकी कोणतेही दोन क्लेम ४९९ रुपयात निवड करून घ्यायचे होते .शेतकऱ्यांनी अँनिमल अटॅक आणि वेदर इफेक्ट वारा वादळ पाऊस ह्या दोन गोष्टी निवडून इन्शुरन्स करून घेतला होता. कंपनीचं असं म्हणणं होतं नो पेपर क्लेम फोटो पाठवा इन्शुरन्स घ्या ह्या फक्त भुल थापाच ठरल्या. दुर्दैवाने दिनांक २०मे २०२५ परत दुसऱ्या दिवशी दिनांक २१मे २०२५ ला लाखनी तालुक्यात केसलवाडा वाघ येथे वारा वादळ पाऊस थैमान घातला होता. त्यात बहुतांश शेतकऱ्यांचे धान्याचे पीक भुई सपाट झाले होते. म्हणून इन्शुरन्स कंपनीने नेमलेल्या ऐजंटला बोलावून गुगल कॅमेऱ्याने फोटो काढून कंपनीला पाठवले असता कंपनी इन्शुरन्स क्लेम देण्यास टाळाटाळ करत आहे. त्यामुळे ही कंपनी शेतकऱ्यांची फसवणूक करत आहे की काय असा संभ्रमत शेतकऱ्याच्या मनात निर्माण झाला आहे अशा फसवणूक करणाऱ्या कंपनीवर कायदेशीर गुन्हा दाखल करून इन्शुरन्स मान्यता रद्द करावी जेणेकरून पुन्हा भूलथापा देऊन शेतकऱ्यांची फसवणूक होणार नाही असे मत शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.

RNI No.- MAHAMAR-2010/35801
महासागर भंडारा
**मालक, मुद्रक, प्रकाशक** -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर-१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, गांधी चौक समोर, भंडारा येथे प्रकाशित केले. **संपादक**- श्रीकृष्ण तनसुखदास चांडक मुख्य कार्यालय फोन -०७१२-२७६७६२८- ९३७३११७०४२ * स्थानिक संपादक-**सुरेश लक्ष्मण कोटगले,** फोन -८७९३१९१२१३ * (पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांचेवर राहील.)

